**CNR: MHAH21-000002-2018**

**संक्षिप्त फौ.खटला क्र. १/२०१८.**
**नि. क्र. १० लगत**

## न्यायनिर्णय

( दिनांक १३ नोव्हेंबर, २०१८ रोजी घोषीत केला )

१. अभिलेखावरील पुरावा, अभियोग पक्षाचे कथन पाहता, खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक ३१/१२/२०१७ रोजी रात्री ९:३० वाजणेचे सुमारास, आरोपी जामखेड ते अहमदनगर जाणारे रोडवर, त्याचे ताब्यातील बजाज मोटारसायकल क्र. एमएच १६ एएक्स–९२५८ ही दारुचे नशेमध्ये चालवित असताना मिळुन आला असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | ..होकारार्थी. |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ साठी** :

२. आरोपीविरुद्ध असलेल्या गुन्हयाचा शाबीतीसाठी अभियोग पक्षाने फक्त साक्षीदार क्र.१ पो.ना. अजिनाथ विश्वनाथ बडे यांना तपासलेले आहे.

३. साक्षीदार क्र.१ फिर्यादी अजिनाथ विश्वनाथ बडे याचे जबाबात असे आले आहे की, त्या दिवशी त्याची खर्डा चौकात वाहतुक नियंत्रक म्हणून डयुटी होती. त्या दिवशी रात्री ९:३० वाजता एक इसम त्याचे ताब्यातील बजाज

सिटी १०० मोटारसायकल क्र.एमएच १६ एएक्स ९२९८ नगर ते जामखेड जाणारे रस्त्यावर दारुचे नशेमध्ये चालविताना मिळून आला. सदर इसमास त्याने ताब्यात घेवुन त्यास जामखेड पोलीस ठाण्यात घेवुन आलो. ग्रामीण रुगालयात आरोपीची वैद्यकीय तपासणी केली असता आरोपी दारुच्या नशेमध्ये असल्याचे आढळुन आले. त्याने ग्रामीण रुग्णालयातील अधिका—यांना आरोपीची तपासणी करणेकामी पत्र दिले होते. त्यानंतर जामखेड पोलीस ठाण्यात आरोपीविरुध्द फिर्याद दिली. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्याने जेंव्हा आरोपीस दारुच्या नशेत ताब्यात घेतले त्यावेळी त्याचेसोबत त्यांच्या पोलीस ठाण्यातील पो.कॉ. अल्ताफ शेख व गव्हाणे असे हजर होते.

४. उलटतपासादरम्यान सदर साक्षीदारास आरोपीतर्फे सुचविण्यात आलेल्या सर्व बाबी नाकारण्यात आलेल्या आहेत. प्रकरणात दाखल असलेला कागदोपत्री पुरावा आणि फिर्यादीने दिलेल्या साक्षीवरुन आरोपीने गुन्हा केल्याचे दिसून येत आहे आणि ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केलेली आहे. सदर साक्षीदाराची साक्ष संयुक्तिक, पारदर्शक व अभियोग पक्षाच्या कथनास दुजोरा देणारी आहे. एकंदरीत, अभियोग पक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द केला आहे. आरोपीला शिक्षेबाबत विचारणा केली असता आरोपीचे वकीलांनी आरोपीस कमीत कमी शिक्षा करण्यात यावी असा युक्तीवाद केला. गुन्हयाचे स्वरुप पाहता, मी या निष्कर्षाप्रत येतो की, आरोपीला द्रव्यदंडाची शिक्षा देणे न्यायोचित राहिल. सबब, मी वरील चर्चेवरुन, मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे. मुद्दा क्र. २ साठी खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपीस फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (२) प्रमाणे मोटार वाहन कायदा कलम १८५ नुसार ठेवलल्या अपराधासाठी दोषी ठरवुन आरोपीस रक्कम रु.५००/— (रुपये पाचशे मात्र) द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे.

२. आरोपीने दंडाची रक्कम न भरल्यास एक महिना साधी कैद शिक्षा भोगावयाची आहे.

३. आरोपीचा जामीन रद्द करण्यात येत आहे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला)

**(हाश्मी एच.ए.एच.आय.)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग
जामखेड.

दिनांक १३/११/२०१८.